**महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ**
हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,
एलफिन्स्टन, मुंबई ४०००१३
दूरध्वनी क्रमांक:२४३०६७१७/२४२२७७५८/४३२२६८००
जा.क्र.: मका/कार्य/२०१५-१६/११२३ दिनांक :- ०१/०८/२०१५

## परिपत्रक

**विषय :- गंभीर आजार वैद्यकीय उपचार सहायता योजना.**
संदर्भ :- मका/कार्य/२०१४-१५/८०४ दिनांक. २४.०७.२०१४

मध्यवर्ती कार्यालयाच्या उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये "असाध्यरोग सहाय्यता योजना" साठी परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहे.

या परिपत्रकान्वये असाध्यरोग सहाय्यता योजनेचे नाव बदलून **"गंभीर आजार वैद्यकीय उपचार सहायता योजना"** असे करण्यात येत आहे.

या योजने अंतर्गत महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडे कामगार कल्याण निधी भरणाऱ्या कामगार व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना गंभीर आजार झाल्यास त्याच्या वैद्यकीय उपचाराकरीता आर्थीक सहाय्यता देण्याची मंडळाची योजना आहे.

**वैशिट्ये** :-

१) या योजनेत महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडे कामगार कल्याण निधी भरणाऱ्या कामगार व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना लाभ घेता येतो.

२) कमीत कमी रु.५०००/- ते जास्तीत जास्त रु.२५०००/- पर्यंत आर्थीक लाभ दिला जातो.

३) एकदा लाभ घेतल्यानंतर पुन्हा लाभ घेता येत नाही.

४) या योजने अंतर्गत १)ब्रेन ट्युमर, २)ह्रदय शस्त्रक्रीया, ३) क्षय रोग, ४) एड्स, ५)मुत्रपिंड प्रत्यारोपण, ६) कर्करोग, ७) कोमा, ८) गँगरीन ९) गंभीर स्वरुपाचे पॅरालिसीस, १०) गंभीर स्वरुपाचे सिकलसेल , ११) इतर गंभीर स्वरुपाचे आजार ज्यास मंडळाने चिकित्सकांच्या सल्लयाने गंभीर आजार म्हणून मान्यता दिलेली असावी. या आजारावरील वैद्यकीय उपचारासाठी आर्थीक लाभ दिला जातो.

५) आर्थीक सहाय्यता रकमेचा तपशील.

| क्रं. | रुग्णाचा झालेला खर्च | आर्थिक सहाय्य |
|---|---|---|
| १ | रु. १०,०००/- ते रु.२५,०००/- पर्यंत | ५,०००/- रुपये |
| २ | रु. २५,००१/- ते रु.५०,०००/- पर्यंत | १०,०००/- रुपये |
| ३ | रु. ५०,००१/- ते रु.७५,०००/- पर्यंत | १५,०००/- रुपये |
| ४ | रु. ७५,००१/- ते रु.१,००,०००/-पर्यंत | २०,०००/- रुपये |
| ५ | रु.१,००,००१/- पेक्षा जास्त खर्च | २५,०००/- रुपये |

**नियम व अटी :-**

१) अर्जदाराने मंडळाच्या जवळच्या कामगार कल्याण केंद्रामध्ये विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

२) संबधित केंद्र प्रमुखांनी सदर अर्जदारास केंद्राचे सर्वसाधारण सभासद म्हणून नोंदणी करावी.

३) अर्जदाराने सर्व शासकीय, महानगरपालिका/नगरपालिका,सार्वजनिक, शासनमान्य, धर्मादाय आणि खाजगी रुग्णालयात उपचार घेतलेला असावा किंवा उपचार सुरु असावा.

४) सदर रुग्णालयात घेतलेल्या उपचारांचे / शस्त्रक्रीयेचे कागदपत्र तसेच आजारावर वैद्यकीय उपचाराकरीता झालेल्या खर्चाच्या पावत्या सत्य प्रती सोबत जोडाव्या. पावत्या १ वर्षाच्या आतील असाव्यात.

५) सदर अर्जदारावर उपचार सुरु असल्यास रुग्णाच्या वैद्यकीय उपचाराचा येणारा खर्चाचा वैद्यकीय अधिकाऱ्याचा दाखला सोबत जोडावा.

६) माहे जून किंवा डिसेंबर ची वेतन पावती सोबत जोडावी ज्यामध्ये कामगार कल्याण निधी कपात केल्याचा उल्लेख असावा.(अर्जदार कामगार असल्यास स्वत:ची किंवा पालकाची).

७) अर्जासोबत अर्जदार/ पालक ज्या आस्थापनेत काम करीत आहे त्या आस्थापनेचा कामगार कल्याण निधी भरणा केल्याचा आणि त्यामध्ये जून किंवा डिसेंबर चा निधी मंडळाकडे भरणा केल्याचा धनादेश क्र. व दिनांक मंडळाकडील आस्थापना नोंदणी क्रमांक नमुद करावा.

८) अर्ज मंजुर झाल्यानंतर अर्जदारास रेखांकीत धनादेशाद्वारे रक्कम देण्यात येईल.

९) रुग्णावर रुग्णालयात वैद्यकीय उपचार सुरु असल्यास आर्थीक सहाय्याची रक्कम रुग्णालयाच्या नावाने धनादेशाद्वारे अदा करण्यात येईल.

१०) या योजने अंतर्गत मंडळाकडे अर्ज सादर केल्यानंतर अर्ज विचाराधिन असताना रोगी मृत पावल्यास कामगारास अथवा कामगारांच्या वारसाला वरील नियम आणि अटींची पूर्तता करीत असल्यास आर्थीस सहाय्याची रक्कम अदा करण्यात येईल.

या योजने अंतर्गत केंद्र प्रमुखांनी अर्जाची तपासणी करुन अर्ज स्विकारल्या नंतर दहा दिवसांत सदरचे अर्ज गट कार्यालयास सादर करावे. गट प्रमुखानी अर्जाची तपासणी करून त्यांना प्राप्त झालेल्या तारखेपासून दहा दिवसात विभागीय कार्यालयाकडे सादर करावे. विभाग प्रमुखांनी या योजनेच्या नियम व अटी नुसार विभाग स्तरावर ८ दिवसाच्या आत निर्णय द्यावा. जे अर्ज मंजूर होतील, त्याप्रमाणे मंजूर रकमेचा धनादेशाचे वाटप १५ दिवसाच्या आत लाभार्थींना करण्यात यावे. ही योजना राबविताना प्रत्येक स्तरावरील कालमर्यादा पाळणे बंधनकारक राहील.

सदरचे परिपत्रक दिनांक १ ऑगस्ट २०१५ पासून पुढील आदेश निघेपर्यंत अमलात राहील.

सोबत – अर्जाचा नमुना

कल्याण आयुक्त

प्रत,

१) लेखा परिक्षा अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई

२) लेखा व लेखा परिक्षा अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई

३) सहायक कल्याण आयुक्त, कार्यक्रम मध्यवर्ती कार्यालय, मुंबई

४) प्रसिद्धी व जनसंपर्क अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई

५) सहायक कल्याण आयुक्त,विभागिय कार्यालय,ठाणे/मुंबई/नागपूर/नाशिक/पूणे/
कामगार क्रीडा भवन, मुंबई

६) प्रभारी सहायक कल्याण आयुक्त,विभागिय कार्यालय, अकोला /औरंगाबाद

७) सहायक लेखा अधिकारी, सर्व विभागिय कार्यालये.

८) कामगार विकास अधिकारी, का.क.भवन नागपूर/पुणे.

९) कामगार कल्याण अधिकारी (१८ गट कार्यालये).★★★

१०) सर्व केंद्र प्रमुख

★★★ सदरचे परिपत्रक केंद्र प्रमुखांना उपलब्ध करुन द्यावे.

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,
एलफिन्स्टन, मुंबई ४०००१३
दूरध्वनी क्रमांक:२४३०६७१७/२४२२७७५८/४३२२६८००

जा.क्र.: मका/कार्य/२०१५-१६/29 दिनांक :- 6/1/2016

## परिपत्रक

विषय :- गंभीर आजार वैद्यकीय उपचार सहायता योजना.

संदर्भ :-१) मका/कार्य/२०१५-१६/११२३ दिनांक. ०१.०८.२०१५

२) ठराव क्र. मकाकम/२१/१३/८/१४२ दिनांक ३१.१२.२०१५

मध्यवर्ती कार्यालयाच्या उपरोक्त संदर्भीय क्र. १ अन्वये गंभीर आजार वैद्यकीय उपचार सहायता योजनासाठी परिपत्रक निर्गमीत करण्यात आलेले आहे. या योजनेच्या सध्याच्या नियमानुसार योजनेचा एकदा लाभ घेतल्यानंतर पुन्हा लाभ घेता येत नाही.

वरील संदर्भ क्र.२ नुसार मंडळाच्या दिनांक १६ अक्टोबर २०१५ रोजीच्या बैठकीमध्ये झालेल्या ठरावानुसार गंभीर आजार वैद्यकीय उपचार सहायता योजनेतील नियम व अटी नुसार एका व्यक्तीस एका गंभीर आजारा करीता एकदा लाभ दिल्यानंतर पुन्हा दुसरा गंभीर आजार झाल्यास त्यांना दुसऱ्यांदा लाभ देण्यास मान्यता व मंजूरी देण्यात येत आहे.

तरी मंडळाच्या सर्व संबंधीत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वरीलप्रमाणे नोंद घ्यावी.

कल्याण आयुक्त

प्रत,

१) लेखा व लेखा परिक्षा अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई
२) लेखा अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबइ
३) सहायक कल्याण आयुक्त, कार्यक्रम मध्यवर्ती कार्यालय, मुंबई
४) प्रसिद्धी व जनसंपर्क अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई
५) सहायक कल्याण आयुक्त,विभागिय कार्यालय,ठाणे/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे/ कामगार क्रीडा भवन, मुंबई
६) प्रभारी सहायक कल्याण आयुक्त,विभागिय कार्यालय, अकोला /औरंगाबाद
७) सहायक लेखा अधिकारी, सर्व विभागिय कार्यालये.
८) कामगार विकास अधिकारी, का.क.भवन नागपूर/पुणे.
९) कामगार कल्याण अधिकारी (१८ गट कार्यालये).***
१०) सर्व केंद्र प्रमुख

*** सदरचे परिपत्रक केंद्र प्रमुखांना उपलब्ध करुन द्यावे.